International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# पाश्चात्य स्त्रीवाद

**श्रीमती लता उत्तम खेडकर[1], प्रोफेसर डॉ. अशोक ऊ. घोळवे[2]**

[1]*संशोधक, संशोधन केंद्र - वसंत दादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा जि. बीड*

[2]*मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख*

*कालिका देवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर ( का.) जि. बीड*

*Corresponding Author – श्रीमती लता उत्तम खेडकर*

**DOI - 10.5281/zenodo.17656934**

स्त्रीवाद या शब्दाची उत्पत्ती पाश्चात्य स्त्रीमुक्तीच्या विचारातून झाली आहे. फ्रान्स मधील समाजवादी तत्ववेत्ते चार्लस फाऊरीएर यांनी १८३७ मध्ये "थिअरी ऑफ फोर मुव्हमेंट्स" या पुस्तकात फेमिनिझम हा शब्द पहिल्यांदाच त्यांनी वापरला. सामाजिक प्रगतीचे तत्व आपोआपच स्त्रियांना स्वातंत्र्य देते असे त्यांचे मत होते. त्यानंतर फ्रान्समधील स्त्री मताधिकार समाजाच्या संस्थापक ह्युबटाईन ऑकलर्ट यांनी १८८० मध्ये फेमिनिझम हा शब्द वापरला असे म्हणणे स्त्रीवादी इतिहासकार नॅन्सी कांट यांचे आहे त्यानंतर फेमिनिझम ही संज्ञा पुढील दहा वर्षाच्या काळात इंग्लंडमध्ये जाऊन पोहोचली अमेरिकेत फेमिनिस्ट या संज्ञाचा उच्चार फ्रेंच स्त्रियांच्या मताधिकार चळवळीतून स्फूर्ती घेऊन मॅडेलाईन पेलेटीएर या अमेरिकेतील समाजवादी स्त्रीवादी कार्यकर्तीने १९०६ मध्ये त्यांच्या लिहिलेल्या लेखात केला.

स्त्रियांना हळूहळू एक व्यक्ती म्हणून स्वतःमधील अपूर्णत्वाची जाणीव होऊ लागली आपल्यालाही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार पाहिजे असे स्त्रियांना वाटू लागले व त्यांनी आपल्या हक्कासाठी लढायला सुरुवात केली. आपल्याकडील स्त्रियांच्या मानाने इंग्लंड अमेरिकेतील स्त्रियांची स्थिती खरोखरच खूप चांगली होती परंतु एक स्त्री म्हणून तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सगळीकडे सारखाच होता. कालांतराने स्त्रियांना आपल्या परस्वाधीन आयुष्याची जाणीव झाली. पुरुषप्रधान संस्कृतीकडे त्या आपल्या हक्काची स्वातंत्र्याची मागणी करू लागल्या आणि त्यामधूनच पाश्चात्य देशांमध्ये स्त्रीवादी चळवळी सुरू झाल्या. स्त्रीवाद ही संकल्पना पाश्चात्त्य देशातील साहित्यातूनच आपल्याकडील मराठी साहित्यात आली. स्त्रीवादी साहित्याचा विचार १९६० नंतरच आपल्या मराठी साहित्यात होऊ लागला.

"मेरी वोलस्टोन क्रॉफ्टने अनेक मुद्दे उपस्थित केले जे पुढील काळात स्त्री- चळवळींनी पुढे नेले"[1] मेरी वोलस्टोन क्राफ्ट म्हणतात की, एक गोष्ट मान्य करायला पाहिजे की, ती स्त्री आणि पुरुष यांनी विवेकावर आधारित एक कुटुंब उभे करावे की ते लोकशाहीवादी असेल त्यामध्ये मुले आपल्या पालकांचे दोष नजरेआड करणार नाहीत. मुले मुली एकत्र शिकतील तर कणखर नैतिकता निर्माण होईल त्यातून एक नैतिक दृष्ट्या कणखर राष्ट्र निर्माण होईल. या चौकटीतच स्त्रियांच्या

मुक्तीचा विचार करत आहे की, तिचा सर्व भर ज्ञान संपादन करण्यावर आहे. सहाजिकच स्त्रियांना उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण दिल्यावर त्यांच्या मनाची विवेकी मशागत होईल त्या बालिशपणे व हुशारपणे त्यांना पाहिजे ते पदरात पाडून घेण्याच्या शकल लढवणार नाहीत शिवाय बायकांच्या बाबतीत खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रांची काटेकोर बंदिस्त विभागणी ही किती त्रासदायक आहे हे तिने आग्रहाने पुढे आणले. याचे पुढील परिणाम जे - जे खाजगी ते - ते राजकीय या स्त्रीवादी घोषणेत केले विवेक ही जर माणसाची विशेष क्षमता असेल तर ती स्त्रीमध्येही असते व ती विकसित होऊ दिली नाही तर संपूर्ण मानवी समाजाचे नुकसान आहे. हा मुद्दा त्या वारंवार समोर मांडताना दिसतात.

"१७७६ मध्ये अमेरिकेत अबिगेल अँडम्स काय म्हणत होती हे या ठिकाणी नोंदवणे योग्य ठरेल"[2] अबिगेल ॲडम्स म्हणतात की, माझा नवरा जॉन ॲडम्स अमेरिकेचा कायदा लिहिण्याच्या प्रक्रियेत गुंतला होता तेव्हा मी त्याला पत्र लिहून सांगितले की, माझी अशी इच्छा आहे की अमेरिकन स्वातंत्र्याची घटना लिहिताना तू स्त्रियांना लक्षात ठेवावेत, तुझ्या पूर्वजा पेक्षा त्यांच्या प्रति अधिक उदार असावेस आणि त्यांच्या बाजूने विचार करावास, नवऱ्याच्या हातात अशी अमर्याद सत्ता देऊ नकोस लक्षात असू दे की शक्य असेल तर सर्व पुरुष जुलुमशहा बनतील.....पण तुझ्या लक्षात असू दे की वस्तू जेवढी जास्त कडक तेवढी ती तुटण्याची शक्यता अधिक, तसेच जुलमी सत्तेचेही आहे तुझे सगळे शहाणे कायदे आणि नियम धुडकावून स्वतःला मुक्त करण्याची एवढेच, नाही तर आमच्यावर सत्ता गाजवणाऱ्यांना शरण आणण्याची ताकद आमच्यात आहे कोणतीही शक्ती न वापरता तुझे नैसर्गिक आणि कायदेशीर अधिकार आमच्या पायी लोळवण्याचीही ताकद आमच्या जवळ आहे अमेरिकन राज्यघटना लिहिण्याच्या काळात अबिगेलने दिलेली सूचना अर्थातच दुर्लक्षित झाली किंबहुना जॉन ॲडम्सने त्याची अशी संभावनाही केली अमेरिकेमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळायला १९१९ साल उजाडले काळ्या स्त्री-पुरुषांना तर १९६४ मध्ये मिळाला तर नागरी अधिकार १९६५ मध्ये या सर्व घटना लक्षात घेता अबिगेल ॲडम्स ही उच्चवर्गीय गोरी स्त्री होती म्हणून तर ती इतक्या सहजपणे बोलू शकली ही वस्तुस्थिती दुर्लक्षून चालणार नाही. स्त्रीवादाच्या विविध आयामांच्या दृष्टीने तिच्या म्हणण्याची प्रस्तुतता नाकारून चालणार नाहीत. त्यानंतर २०व्या शतकात स्त्रीवादी विचारधारांचा जन्म झाला. अबिगेल अँडम्स एक स्त्री असल्यामुळे जॉन ॲडम्स तिचा नवरा असून देखील तिचे मत, तिचे कायद्याविषयी विचार, त्याने विचारात घेतले नाही त्याकडे त्याने दुर्लक्ष केले.

"ऑलिम्प - द गॉजेस या फ्रेंच स्त्रीने नॅशनल असेंबली पुढे १७ मागण्या सादर केल्या होत्या"[3] ऑलिम्प - द गॉजेस ही फ्रेंच स्त्री असेंब्लीमध्ये म्हणाली स्त्रियांना स्वातंत्र्य, हक्क, समानता मिळाली पाहिजे, अशा तिने सतरा मागण्या नॅशनल असेंबली मध्ये मांडल्या होत्या. स्त्रीया ह्या बुद्धिमान आहेत, त्यांच्या बुद्धीला जर चालना मिळाली तर त्या नक्कीच यशस्वी होतील. अन्यथा फ्रेंच राज्यक्रांती म्हणजे केवळ एक ढोंग ठरेल असे मत तीने मांडले. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जगात सर्वत्र समाजाचे लोकशाहीकरण होण्याची प्रक्रिया सुरू झाली स्त्रियांच्या दृष्टीने हा कालखंड अत्यंत महत्त्वाचा होता. त्याचे कारण म्हणजे त्या काळात कायद्याला महत्त्व प्राप्त झाले होते. जॉन स्टुअर्ट मिल हॅरिएट टेलर यांनी केलेला स्वातंत्र्यवादी विचारसरणीचा पुरस्कार ह्या दृष्टीने महत्त्वाचा. आहे. 'द एन्फ्रान्चिसमेंट ऑफ वुमेन' या ग्रंथात टेलरने आणि ' सब्जेक्शन ऑफ वुमेन्स' ह्या ग्रंथात मिलने मतदानाचा

अधिकार स्त्रियांना मिळालाच पाहिजे, या मताला प्राधान्य दिले मतदानाच्या अधिकारापासून स्त्रियांना कोणत्या तत्त्वावर वगळण्यात आले ? मग स्त्री व्यक्ति नाही का? स्त्रीचा व्यक्ती म्हणून जगण्याचा अधिकार हिरावून घेण्याचा समाजाला काय अधिकार आहे? असे प्रतिपादन स्वातंत्र्याच्या जाहीरनामात केले आहे. तर अशा प्रकारचे अनेक प्रश्न हॅरीएट व जॉन स्टुअर्ट मिल ह्या जोडीने उपस्थित केले.

अशाप्रकारच्या अनेक अडचणींना सामोरे जाऊन पाश्चात्य स्त्रीवादी स्त्रीयांनी आपला मार्ग शोधला स्त्रीवादी स्त्रियांचे प्रयत्न स्त्रीला व्यक्ती स्वातंत्र्य मिळण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. या प्रयत्नातून स्त्रियांना विचार, स्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य मिळाले. समान स्वातंत्र्य, समान दर्जा, समान हक्क ह्या कल्पना पाश्चात्त्य स्त्रीवादाने फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतलेल्या आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीतून स्त्रीवादी स्त्रियांनी प्रेरणा घेतली असली तरी फ्रेंच राज्यक्रांतीने स्त्रियांना काहीच दिले नाही असेच दिसते.

अमेरिकेतील स्त्रियांना स्त्रीवादाची प्रेरणा मिळाल्यावर नवीन जाणिवा विकसित झाल्या व स्त्रियांना पुरुषांपासून हवी असलेली मुक्ती, स्त्रियांचे इतर भावनिक प्रश्न, समानता, स्वातंत्र्य, शिक्षण इत्यादी प्रश्नांचा स्त्रीया विचार करू लागल्या. अमेरिकेतही स्त्री-पुरुष समानतेचा स्वीकार केला गेला. आपल्यालाही पुरुषासारखेच व्यक्ती स्वातंत्र्य, विचास्वातंत्र्य पाहिजे, असे स्त्रियांना वाटायला लागले. यामधूनच विसाव्या शतकात स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला. अमेरिकेतील धर्मगुरूंची सुद्धा पुरुषांच्या आधाराशिवाय स्त्री जगू शकत नाही अशी समजूत होती. आपल्यासारखेच सनातनी लोक तेथे होते ह्या सर्व गोष्टींना स्त्रियांना तोंड द्यावे लागले. अमेरिकेतील स्त्रियांचे देखील भारतातील स्त्रीया प्रमाणेच घर हे विश्व होते. तिला स्वतःकडे लक्ष द्यायला वेळही मिळत नसे. स्त्रीवादी स्त्रिया ह्या राक्षसणी आहेत, त्या पुरुषांना गुलाम बनवू इच्छित आहेत अशा प्रकारची टीका स्त्रियावर करत असे आणि या टिकेला स्त्रीयांना सामोरे जावे लागत असे घर की करिअर अशा द्विधा मनस्थितीत या स्त्रियांचे बरेच हाल झाले.

सोळाव्या शतकापासून पाश्चात्य स्त्रियानी आपल्या हक्काविषयी जागरूकपणे विचार करण्यास सुरुवात केली होती, परंतु पुरुषप्रधान संस्कृतीची पाळीमुळे इतकी घट्ट रोवली होती की त्यांनी स्त्रियांचा आवाज जवळजवळ तीन-चार शतके दाबून ठेवला स्त्रियांना त्यांच्या हक्कापासून दूर ठेवले. यामुळेच पाश्चात्य स्त्री अधिक आक्रमक झाली तिने अधिक आक्रमकतेने पुरुषी वर्चस्वाला आव्हान दिले. स्त्री -पुरुष एकमेकांचे शत्रू झाले अशी परिस्थिती निर्माण झाली. अमेरिकेमध्ये याचेच प्रतिबिंब सुरुवातीला स्त्रीवादी विचारसरणीवर पडलेले दिसून येते. सीमाँन द - बोव्हापासून इतर अनेक स्त्रीवादी लेखिकांनी कुटुंब, घर, लग्न, मातृत्व ह्या सर्व गोष्टींना ठामपणे नकार देऊन पुरुषी गुलामगिरीपासून स्वतःला मुक्त केले पाहिजे अशा प्रकारचे विचार व्यक्त केले.

स्त्रीवाद्यांची इतकी भूमिका टोकाला जाण्याचे कारण म्हणजे पुरुषी तसेच पाश्चात्य विचारवंतांनीही स्त्रियांना वारंवार कमजोर लेखले त्यांनी स्त्रीत्वाच्या भूमिकेतच कैद करणारे विचार मांडले. आपल्या हक्कासाठी जागरूक असणाऱ्या स्त्रियांच्या मानसिकतेवर ह्या गोष्टीचा परिणाम झाला. त्यामुळे प्रखर विचारातून त्या आपल्या स्त्री भूमिके विषयी विचार करू लागल्या. स्वतःच्या भूमिकेवर ठाम राहून अनेक अडचणींना तोंड देऊन पश्चात्य स्त्रियांनी आपले राजकीय व सामाजिक हक्क मिळविले. आज पाश्चात्य स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षा दोन पावले पुढे आहेत असे

आढळते. आज जगामध्ये प्रत्येक क्षेत्रात स्त्रीने स्वतःच्या सामर्थ्याने प्रवेश मिळवला आहे. त्या वेळेच्या काळामध्ये प्रखर वाटणारी स्त्रीवादाची भूमिका आज बऱ्याचशा प्रमाणात समाजमान्य होत आहे. ह्या प्रश्नांचा आपण जरा वेगळ्या दृष्टिकोनातूनही विचार करू शकतो. पाश्चात्य स्त्रियांना आपल्या स्त्रियांना स्वतःच्या हक्कासाठी प्रखर लढा द्यावा लागला होता, पण जरा पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांची बाजू समजून घेतली असती, स्त्रियांनाही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे असा विचार करून, त्यांना समान स्वातंत्र्य, समान हक्क, समान दर्जा, या स्त्रीवादी तत्वांचा पुरस्कार लवकर केला असता तर खरोखर स्त्रीवाद्यांनी एवढी टोकाची भूमिका घेतली नसती. परंतु स्त्रियांनी आपली दासी म्हणूनच जगले पाहिजे, स्त्रियांनी आपली गुलामगिरी केली पाहिजे, अशा या बुरसटलेल्या विचाराने प्रभावित असलेल्या पुरुषप्रधान संस्कृतीची मानसिकता एकदम बदलणे तर शक्यच नव्हते. ही मानसिकता बदलण्यासाठी पाश्चात्य स्त्रियांना तीन चार शतके मोठ्या प्रमाणावर आपला संघर्ष सुरूच ठेवावा लागला तेव्हा कोठे स्वतंत्रपणे विचार करण्याची आणि माणूस म्हणून जगण्याची, मुभा ह्या स्त्रियांना मिळाली त्यानंतरच पाश्चात्य स्त्रीवादी विचारसरणी सर्वत्र पसरली असे आपल्याला म्हणता येईल.

"अमेरिकन स्त्री स्वातंत्र्याचा इतिहास पाहिला तर जगाच्या तुलनेत अमेरिकन स्त्री ही कित्येक बाबतीत अधिक नशीबवान होती असे म्हणावे लागेल. तरी सुद्धा मानव म्हणून आपले हक्क मिळवण्यासाठी, मिळकतीवरचा हक्क, मतांचा हक्क, अमेरिकन स्त्रियांनाच जास्तीत जास्त लढा द्यावा लागला आहे"[4] १८६३ च्या आधीपासूनच स्त्रीने स्वतःची ओळख पटवून द्यायला सुरुवात केली होती. या काळामध्ये स्त्रियांनी उच्च शिक्षण घेण्याचा हक्क, करीअर करण्याचा हक्क, मतांचा हक्क यांची मागणी करणाऱ्या स्त्रीवाद्याची विटंबना केली गेली. आणि पुरुषांच्या मत्सर व द्वेषातून जन्माला आलेल्या विकृतीचे बळी अशी त्यांची संभावना झाली. निर्णय प्रक्रियेत स्त्रियांना महत्त्वाचे स्थान द्यावे, समाजातील महत्त्वाच्या कामात स्त्रियांचा सहभाग असावा, या स्त्रीवाद्यांच्या विचारसरणीमध्ये विसंगती आहे, कारण पुरुषांचे वर्चस्व मान्य करणे, आई, म्हणून मुलांना जन्म देऊन त्यांचे पालन, पोषण करणे एवढेच स्त्रीचे कार्यक्षेत्र आहे आणि स्त्रीवाद्यांची मागणी ही स्त्रियांच्या नैसर्गिक स्वभावाला धरून नाही असा युक्तिवाद करण्यात आला.

कालांतराने पुरुषांची कार्यक्षेत्रे अधिक विस्तारली गेली त्यांच्या व्यक्तीत्वाचा विकास झाला पण 'शरीर' हेच प्राणीमात्राप्रमाणे स्त्रियांचे एकमेव कार्यक्षेत्र राहिले व मानवाचे व्यवच्छेदक लक्षण जे मन व बुद्धी आहे त्यांचा विकास मात्र फक्त पुरुषांपुरता सीमीत झाला. स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी, तसेच तिला माणूस म्हणून जगता यावे, माणूस म्हणून असलेले अधिकार यासाठी लढा देताना अनेक स्त्री कार्यकर्त्यांनी तुरुंगवास व हौतात्म्य पत्करले. ही चळवळ पुरुष द्वेषाातून, कडवट प्रक्रियेतून, लैंगिक सुख न मिळालेल्या असंतुष्ट बायकाकडून किंवा लिंग अभावातून आलेल्या वैफल्यातून तसेच ज्या स्त्रीमध्ये प्रेम करण्याची शक्ती नसलेल्या बायकांकडून उदयाला आली असे म्हणणे म्हणजे ऐतिहासिक सत्याला विकृत वळण देण्यासारखे आहे. या चळवळीतील मेरी वोलस्टोन क्राफ्ट किंवा तिच्या अन्य सहकारी स्त्रिया या सुखी समाधानी वैवाहिक जीवन जगणाऱ्या होत्या. सुजन एन्थानीसारख्या ज्या काही स्त्रीया होत्या, त्या पुरुषाशिवायही स्वतःच्या व्यक्तीत्वाला आकार देऊ शकत होत्या. व्यक्ती म्हणून त्या वाढू शकतात, प्रेमाइतकीच माणसासारखं जगणं ही स्त्रीची भूक आहे हे

सिद्ध करणाऱ्या होत्या. या स्त्रीवाद्यांच्या मुक्त जीवनाचा आदर्श होता तो म्हणजे पुरुषांचा, कारण असे स्वातंत्र्य पुरुष उपभोगत होते. आपल्या क्षमतांची पुर्ण ओळख पटविणारे शिक्षण त्यांना मिळत होते. प्रेम करण्याचे उपभोग घेण्याचे स्वतःचे निर्णय चूक की बरोबर हे ठरविण्याची मुभा होती. सुरुवातीच्या काळात स्त्रीवाद्यांच्या मनामध्ये पुरुषासारखे होण्यासाठी स्वतंत्र्य हवे की माणूस म्हणून जगण्यासाठी स्वातंत्र हवे थोडा वैचारिक गोंधळ निर्माण झाला. १८७९ मध्ये इब्सेनने आपल्या 'डॉल्स हाऊस' या नाटकात नोराच्या रूपाने स्त्रीच्या माणूसपणाची जरुरी व्यक्त केली. युरोप अमेरिकेमध्ये हजारो स्त्रियांनी यावेळी स्वतः ला नोराच्या रूपात पाहिले त्यानंतर देखील अनेक अधिवेशनातूनही स्त्रियांनी आपल्याला दुय्यम दर्जा असल्यामुळे आवाज उठवला अमेरिकेमध्ये स्त्रियांच्या स्वतंत्र्याची चळवळ व गुलामगिरी नष्ट करण्याच्या चळवळीशी समांतर राहिली. हा योगायोग नव्हे माणूस म्हणून जगण्याच्या नाकारल्या जाणाऱ्या हक्काविरुद्धचे हे दोन्ही लढे होते. रशियन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती, हिंदुस्थानांतील चलेजावची चळवळ यांचे नेतृत्व स्त्रियांनी घेतले नसेल पण त्यांचा सहभाग त्यांची स्वातंत्र्याची भूक दाखविणाराच आहे. स्त्रियांना घरात डांबून ठेवल्यामुळे मनुष्य जातीचे प्रचंड नुकसान झाले. त्यानंतर स्त्रियांच्या हक्कासाठी झगडणाऱ्या बुद्धिमान स्त्रियांची गरज निर्माण झाली. मेरी वोलस्टोन क्राफ्ट ही इंग्लिश तत्त्वज्ञानाकडून माणसांच्या हक्काबद्दल जागरूक राहायला शिकली. मार्गारेट फुलरने इमर्सनचे शिष्यत्व पत्करले एलिझाबेथ स्टॅन्टनने आपल्या न्यायाधीश वडिलांबरोबर कायद्याचा अभ्यास केला. इन्स्टाईन रोजने स्त्रीचे दुयमत्व दाखविणाऱ्या धार्मिक तत्त्वाविरुद्ध बंड केले. आणि सनातन धर्मतत्त्वाचा त्याग करून आपल्या आवडत्या व्यक्तीशी विवाह केला. स्त्रियांच्या परंपरागत भूमिकेला चिकटून राहणाऱ्या सनातण्याबरोबर जुन्या पोथ्या पुराणातून स्त्रियांच्या दुय्यमपणाचे दाखले देणाऱ्या पोथीनिष्ठ धर्मगुरुविरुद्धही स्त्रियांना लढावे लागले. स्त्रीवादी बायका अनैसर्गिक राक्षसणी असून परमेश्वराने स्त्रीला दिलेल्या सेवावृत्तीची देणगी नष्ट करून त्या घरादाराची राख रांगोळी करत आहेत आणि पुरुषाला आपला गुलाम बनवू पहात आहेत अशा प्रकारच्या धर्माच्या नावाखाली चाललेल्या प्रचाराला देखील स्त्रियांना सामोरे जावे लागले. हक्क मिळवण्याची स्त्रियांची लायकीच नाही असे समजले जाणाऱ्या त्या स्त्रियांच्या हतबलपणातूनच हा स्त्रीवादी लढा उदयाला आला आपण मिळवलेल्या. मालमत्तेचा मालक आपणच आहोत. घटस्फोटानंतर मुले स्त्रीकडेच राहावीत या विषयावर व्याख्याने देणे सोपे पण हे बदल कायद्याने घडून आणण्याचा कोणताच मार्ग स्त्रीकडे नव्हता. कारण त्यांना साधा मतदानाचाही हक्क नव्हता. मतदानाचा हक्क त्यांना १९१९ मध्ये मिळाला. तसेच त्यांनी आक्रमक भूमिका घेऊन व्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क, समान हक्क, समान दर्जा हे अधिकार कायदेशीररित्या मिळवले आणि आज जगामध्ये क्षेत्र कोणतेही असो पण स्त्री ही पुरुषांच्या पुढे दोन पावले जादा टाकताना दिसत आहे.

**निष्कर्ष:**

१) पुरुषांनी स्त्रियांचा आवाज दाबून ठेवला परंतु स्त्रियांनी आक्रमक भूमिका घेऊन आपले हक्क अधिकार मिळवलेच.

२) लग्न,गृहिणी, मुले, बाळे ह्या गोष्टींना नकार न देताही आपण आपला व्यक्तिमत्त्वाचा विकास करू शकतो याचीच जाणीव पाश्चात्य स्त्रीवादी स्त्रियांना झाली.

३) प्रेम आणि श्रम यांच्या आधारावर स्त्री-पुरुष संबंधाचे अधिष्ठान असावे आणि ते जैविक नात्यापलिकडे असावे. यामधूनच स्त्री व पुरुष दोघांचाही विकास होईल असे मला वाटते.

४) स्त्रीवादी चळवळ ही मानवतावादी चळवळ आहे.

५) जेव्हा स्त्री-पुरुषासारखे स्वतंत्र्य जीवन जगेल आणि तिला ज्यावेळी माणूस म्हणून समाजात दर्जा मिळेल त्यावेळी स्त्रीवादाची गरज भासणार नाही.

**समारोप:**

अशाप्रकारे पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना घरात डांबून ठेवल्यामुळे आणि त्यांचे विचार तीन-चार शतके दाबून ठेवल्यामुळे स्त्रीवादी स्त्रियांनी समाजव्यवस्थेच्या विरोधात जाऊन आक्रमक भूमिका घेऊन स्वतःला माणूस म्हणून जगण्यास जे अधिकार हवे होते ते मिळवले. स्त्रीवादी स्त्रियांनी परंपरेपासून चालत आलेल्या रुढी, प्रथा, परंपरा मोडून काढल्या व नवीन विचारसरणी अवलंबविली. स्त्रीला समाजामध्ये तिचे अस्तित्व टिकवून ठेवायचे आहे, तिला समाजामध्ये आत्मसन्मानाने जगायचे आहे परंतु अजूनही स्त्रियांची आर्थिक, मानसिक, लैंगिक शोषण होत आहे आणि आजही या बुरसटलेल्या विचारांच्या समाज व्यवस्थेला स्त्रियांना तोंड द्यावे लागत आहे.

**संदर्भ :**

१) भागवत वंदना, स्त्रीवाद साहित्य आणि समीक्षा, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर २०१८,पृष्ठ क्रमांक ४४

२) तत्रैव पृ. क्र. ४४

३) डॉ.महाजन वंदना, मराठी कादंबरीतील स्त्रीवाद, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, ७ नोव्हेंबर २०१० पृ.क्र.१४

४) डॉ. धोंगडे आश्विनी, स्वरूप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन,प्रा.लि. पुणे, प्रथम आवृत्ती ३१ जानेवारी १९९३ पृ. क्र. ७